IMPACT FACTOR: 3.012 (IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. - 2 SPECIAL ISSUE - 1 NOVEMBER 2016

A Bimonthly Refereed International Journal

Special Issue On

# UNDERSTANDING THE CONSTITUTION OF INDIA



Chief Editors

PRIN. DR R.T.BEDRE

PRIN. DR T. L. HOLAMBE

Associate Editors

U. Y. MANE A. B. WALKE J. P. KOKANE

Scanned with OKEN Scanner

## CONTENTS


1. A Glance at Secularism in Indian Constitution / Dr. Sunil Shinde & Shekhar Ashtikar | 06
2. A Perspective on Fundamental Rights and Directive Principles in the Indian Constitution / Shekhar Ashtikar | 11
3. Human Rights Violation in the Light of Child Labor Practices in India / Sanket Shinde | 15
4. Women Rights in India: Constitutional Rights and Legal Rights / Kokane J. P. & Shinde S.Y. | 19
5. Children Rights: Constitutional Provisions / Shinde Sheela & Prakash Deshmukh | 24
6. Environmental Concern in Indian Constitution / J. P. Kokane & P. D. Mamadge | 30
7. The Provision of Water Management in the Constitution of India / Kishor N. Ingole | 33
8. Provisions in Indian Constitution for Paradhi Community in Scheduled Tribes ... / Pramod Gadekar | 38
9. Dr. B. R. Ambedkar's Contribution in the Empowerment of Women / Dr. Vandana S. Phatale | 43
10. भारतीय संविधान / प्रा. डॉ. कुलकर्णी व्ही. बी. | 45
11. भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्ती ... / डॉ. कुचेकर एच्. एस. | 49
12. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे तत्वज्ञान ... / प्रा. के. एम. गोलेकर | 58
13. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत तत्त्वे / राजेंद्र सूर्यवंशी | 67
14. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे / प्रा.डॉ.हरिभाऊ कदम | 73
15. भारतीय राज्यघटना निर्मिती - एक दृष्टिक्षेप / डॉ. मुक्ता सोमवंशी | 76
16. भारताच्या संविधानातील दलितांविषयी तरतुदी ... /डॉ. ज्योती व्हटकर | 81
17. भारतीय संविधानात अनुसूचित जाती ... / प्रा.बी.ए.साबळे | 87
18. भारतीय राज्यघटना दुरुस्ती व प्रक्रिया / प्रा. डॉ. आंधळे बी.व्ही. | 91
19. पहिली घटना दुरुस्ती ... / चालीकवार राजेश | 94
20. भारतीय राज्यघटनेतील भाषाविषयक तरतूदी / सचिन गिरी | 98
21. भारतीय संविधानातील महिला विषयक ... / डॉ.दत्ता मा. तंगलवाड | 106
22. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार ... / सचिन पोरे | 110
23. भारतीय राज्य घटनेवर प्रभाव टाकणारी व्यक्ती ... / सचिन डेंगळे | 115
24. भारतीय राज्य घटना व महिला शिक्षण ... / प्रा. वाळके अरुणा | 119




Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# 12.

# भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे तत्वज्ञान : एक अभ्यास

**प्रा. के. एम. गोलेकर**
सहाय्यक प्राध्यापक
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

कोणत्याही देशाच्या राज्यघटनेत निश्चित अशी काही उद्दिष्टे आणि ध्येयधोरणे स्वीकारलेली असतात, ती सर्व राज्यघटनेच्या सुरूवातीलाच उद्देशपत्रिकेत दिलेली असतात. त्यामध्येच राज्यघटनेचा आशय थोडक्यात स्पष्ट केलेला असतो. या उद्देशपत्रिकेवरूनच त्या राज्यघटनेचे उगमस्थान कोणते आहे, राज्यघटनेची उद्दिष्टे कोणती आहेत, त्या देशाच्या राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे आहे, देशातील सामाजिक, आर्थिक राजकीय जीवन कसे असेल याचा सारंश रूपाने उल्लेख केलेला आढळतो. भारतीय राज्यघटनेच्या सुरूवातीलाच अशी उद्देशपत्रिका जोडण्यात आलेली आहे की, ज्यामध्ये वरील बार्बीचा संक्षिप्तपणे उल्लेख केलेला आहे. अशी उद्देशपत्रिका भारतीय घटनाकारांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारली आहे. भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका अत्यंत संक्षिप्त असली तरी तिचे तत्वज्ञान खूप मोठे आहे. या उद्देशपत्रिकेचे तत्वज्ञान स्पष्ट करण्यासाठी तीन भागांमध्ये वर्गीकरण केले जाते.

१. भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान
२. भारतीय शासनव्यवस्थेचे स्वरूप
३. भारतीय शासनव्यवस्थेची उद्दिष्टे

## १ भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान :-

**आम्ही भारतीय लोक We the people of India:-** भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या सुरूवातीलाच 'आम्ही भारतीय लोक' अशी शब्दरचना करण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा होतो की, आम्ही भारतीय जनतेने ही राज्यघटना निर्माण करून आम्ही तिचा स्वीकार करीत आहोत. पण खरोखरच भारतीय जनतेने हे संविधान निर्माण केलेले आहे का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. कारण वास्तवात भारतीय संविधानाची निर्मिती घटनासमितीने केलेली आहे. परंतु या घटनासमितीसाठी निवडलेले प्रतिनिधी जनतेने प्रत्यक्ष प्रौढमतदान पध्दतीने निवडलेले नव्हते, तर ते कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणे अप्रत्यक्ष मतदान पध्दतीने निवडले गेले होते. त्यांनीच संविधान निर्माण केले. या पध्दतीचा अवलंब करण्याचे मुख्य कारण म्हणजे वेळ, पैसा, शक्ती यांचा अपव्यय टाळावयाचा होता. त्या काळात प्रत्यक्ष निवडणूका घेणे कठीणच होते. म्हणून त्रिमंत्री योजनेनुसार



Scanned with OKEN Scanner

घटनासमिती मधील सदस्यांची निवड अप्रत्यक्ष करण्यात आली होती. हे सर्व सभासद प्रांतीय कायदेमंडळाच्या, संस्थानिक व वसाहतीच्या सभासदामधुन निवडले गेले होते. या निवडलेल्या लोकांमध्ये समाजातील विविध गटांचे प्रतिनिधी, पक्षांचे प्रतिनिधी, कायदेपंडित, अनुभवी, मातब्बर राजकारणी अशा लोकांचा समावेश होता. मात्र हे सर्व सभासद जनतेचे खरे प्रतिनिधी नव्हते अशी टिका केली जाते. याचे प्रमुख कारण म्हणजे प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणुकीत फक्त १४% लोकांनाच मतदानाचा अधिकार होता. असे असले तरी घटना समितीचे स्वरूप पाहता समाजातील सर्व स्तरातून घटनासमितीवर प्रतिनिधीत्व झालेले आढळून येते. त्यामुळे घटनासमिती मधील सदस्य जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य नव्हते असे म्हणता येणार नाही. या घटनासमितीने निर्माण केलेली राज्यघटना भारतीय जनतेला मान्य आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्यावर सार्वमत घेणे हा देखील एक पर्याय त्याकाळी होता. मात्र देशात लवकरच सन १९५१-५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात येणार होत्या त्यामुळे घटना मान्यतेसाठी वेगळ्या सार्वमताची आवश्यकता नव्हती असाही युक्तीवाद केला जातो. सार्वत्रिक निवडणूका व सार्वमत या दोन बाबी भिन्न स्वरूपाच्या असल्यातरी सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून जनतेचा कौल महत्वाचा ठरणार होता. कारण जर भारतीय जनतेला घटनाकारांनी निर्माण केलेली राज्यघटना मान्य नसती तर भारतीय जनतेने १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकला असता. उलट जनतेने सार्वत्रिक निवडणुकीत उत्साहाने भाग घेवून घटना समितीत ज्या पक्षाचे सभासद जास्त होते अशा कॉंग्रेस पक्षाला प्रचंड बहुमताने निवडूण दिले आणि घटना विरोधी प्रचार करणाऱ्यांचा दारूण पराभव केला. याचाच अर्थ असा की, भारतीय राज्यघटना भारतीय जनतेला मान्य आहे. त्यामूळेच घटनाकारांनी अत्यंत जाणीवपूर्वक 'आम्ही भारतीय लोक' अशी शब्दयोजना उद्देशपत्रिकेत केलेली आढळते. याशिवाय खालील काही घटनांवरून भारतीय राज्यघटना भारतीय जनतेला मान्य असल्याचे अनेकवेळा सिध्द झाले आहे. ए.के. गोपालन विरूध्द मद्रास राज्य तसेच प.बंगाल विरूध्द अन्वर अली सरकार या महत्वाच्या खटल्यात भारतीय संविधान भारतीय जनतेला मान्य असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. शिवाय गेल्या ६५ वर्षातील भारतीय राजकारणाचा आढावा घेतल्यास कोणत्याही राजकीय पक्षाने, समाज गटाने ही भारतीय राज्यघटना आम्हाला मान्य नसल्याचे म्हटले नाही. असे असले तरी काही सुप्त शक्ती संविधान विरोधी कार्य करताना आढळतात. त्यांचा उघड विरोध नसला तरी ते घटना विरोधी कृती करताना आढळतात. उदा. भारतीय जनता पक्षाने सन १९८४-८५ मध्ये सुरजकुंड येथे भरलेल्या राष्ट्रीय अधिवेशनात भारतासाठी अध्यक्षीय शासनप्रणाली उपयुक्त ठरेल असे वक्तव्य करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून सन १९९९-२००० मध्ये भारतीय जनता पक्ष सत्तेवर असताना न्या.



Scanned with OKEN Scanner

व्यंकट चलय्या यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटनेची समीक्षा करण्यासाठी 'राज्यघटना आढावा समिती' नेमून घटनेची समिक्षा केली होती. सन २००६ मध्ये माजी राज्यपाल सुरजितसिंग बर्नाला यांनी भारतीय संविधानाचे पुनर्लेखन करावे असे म्हटले होते. तर सन २००७ मध्ये माजी रा. स्व. संघ प्रमुख के. सुदर्शन यांनी ब्रिटीश छाप राज्यघटना बदला, घटनेची समीक्षा करा असे म्हटले होते. असे काही अपवाद सोडले तर भारतीय राज्यघटना भारतीय जनतेस मान्य असल्याचेच आढळते.

## २ भारतीय शासनव्यवस्थेचे स्वरूप

या दुसऱ्या शासनव्यवस्थेच्या भागामध्ये सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि गणराज्य या घटकांचा समावेश होतो. या घटकांच्या माध्यमातून भारतीय शासन व्यवस्थेचे स्वरूप समजून येते.

### i. सार्वभौम :-

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत 'सार्वभौम' या शब्दाचा खास उल्लेख करण्यात आला आहे. याचा अर्थ असा होतो की, भारत हा देश अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही बाबतीत स्वतंत्र आहे. राज्याची सर्वोच्च सत्ता म्हणजे सार्वभौम सत्ता असेही म्हटले जाते. भारत अंतर्गत सार्वभौम आहे म्हणजे भारतीय जनता आता स्वतःसाठी कायदा करून त्याचे पालन करू शकते असा अधिकार इतर कोणत्याही देशाला असणार नाही. भारत बाह्य सार्वभौम आहे म्हणजे भारतीय जनता, सरकार स्वतःचे परराष्ट्र धोरण स्वतःच ठरवू शकते. आपण १५ ऑगष्ट १९४७ पूर्वी अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही बाबतीत सार्वभौम नव्हतो. कारण आपल्यावर ब्रिटिशांचे साम्राज्य होते. त्यामुळे भारतीय जनतेसाठी कायदा करण्याचे काम ब्रिटीश संसद करत होती तर भारताचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कामही ब्रिटीश संसदच करत होती उदा. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात उतरण्याचा निर्णय भारतीयांनी किंवा भारतीय संसदेने घेतला नव्हता तर तो निर्णय ब्रिटीशांनी, ब्रिटीश पार्लमेंटने घेतला होता. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारताने राष्ट्रकुलात (सभासद) राहण्याच्या निर्णय घेतला त्यामुळे अनेकांनी भारताच्या या धोरणावर टिका केली आहे. भारताने या टिकेचे खंडन करताना म्हटले आहे की, हे सभासदत्व स्वईच्छेने आणि ब्रिटीशांच्या प्रेरणेणे स्वीकारले आहे. ज्या दिवशी राष्ट्रीय हितसंबंधाना बाधा येईल त्याच क्षणी आम्ही हे सभासदत्व रद्द करू शकतो. त्यामुळे आज भारत बाह्य आणि अंतर्गत अशा दोन्ही बाबतीत सार्वभौम आहे.

### ii. समाजवादी :-

भारतीय संविधानाच्या मूळ उद्देशपत्रिकेत 'समाजवादी' या शब्दाचा समावेश नव्हता. तो सन १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरूस्तीने पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात



Scanned with OKEN Scanner

घालण्यात आला. भारतातील सामाजिक, अर्थिक विषमता दूर करणे म्हणजे समाजवाद होय. देशातील सर्व उत्पादन व वितरण साधनांवर समाजाची जास्तीत जास्त मालकी असणे, खासगी मालमत्तेवर मर्यादा घालणे म्हणजे समाजवाद होय. भारतीय संविधानातील उद्दिष्टांच्या संदर्भातील संदिग्धता दूर व्हावी, भारतीय जनतेचे राहणीमान व पोषणमान सुधारण्यासाठी समाजवादी हा शब्द उद्देशपत्रिकेत समाविष्ठ करण्यात आला आहे. परंतु भारताने १९५५ पासूनच समाजवादी समाज रचना निर्माण करण्याचा व ती स्वीकारण्यास प्रारंभ केल्याचे दिसून येते. आवडी येथील काँग्रेस अधिवेशनात तशी पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी घोषणाही केली होती. पण भारतात खरा समाजवाद कधीच रूजला नाही. त्याला रूजवण्यासाठी लोकशाही समाजवादाच्या माध्यमातून प्रयत्नही झाला. हा समाजवाद 'मिश्र अर्थव्यवस्था' या नावाने ओळखला जातो. पंतप्रधान पंडित नेहरू, इं.गांधी यांची काही धोरणे ही समाजवादी स्वरूपाची होती. परंतु सन १९९० मध्ये जागतिकीकरणाच्या रेटयामुळे भारताला समाजवादी धोरणांपासून फारकत द्यावी लागली. ज्या कॉंग्रेस पक्षाने समाजवादी धोरणांची मुहर्तमेढ या देशात रोवली होती त्याच काँग्रेस पक्षाच्या सत्ताकाळात खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण धोरणांचा स्वीकार करण्यात आला होता. त्यामुळे भारतीय समाजवादाला हद्दपार व्हावे लागले. म्हणूनच की काय १३ नोव्हेंबर १९९९ मध्ये बॅ. विठ्ठलराव गाडगिळांनी समाजवाद आणि धर्मनिर्पेक्षता या शब्दांचा वापर कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी (सोनिया गांधी) कमी करावा असा सल्ला दिला होता. तसेच सन २०१० मध्ये 'समाजवाद' हा शब्द उद्देशपत्रिकेतून वगळण्यात यावा यासाठी एक जनहितयाचिका न्यायालयात दाखल करण्यात आली होती. परंतु ती न्यालयाने फेटाळून लावली. थोडक्यात संपत्ती व जमीन राष्ट्राच्या मालकीची असणे, प्रत्येक व्यक्तिस क्षमतेनुसार काम व दाम देणे हे समाजवादात अपेक्षित असते.

**iii. धर्मनिरपेक्षता:**

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत समाजवादी शब्दाप्रमाणेच 'धर्मनिरपेक्ष' शब्दाचाही समावेश सन १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरूस्तीने करण्यात आला आहे. याचा अर्थ असा होत नाही की, भारत १९७६ पुर्वी धर्मनिरपेक्ष नव्हता. तर भारताने सुरूवातीपासूनच धर्मनिरपेक्ष तत्वांच्या स्वीकार केलेला आहे. फक्त त्या शब्दाचा समावेश उद्देशपत्रिकेत नव्हता धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे भारतीय राज्याला सर्व धर्म सारखे असून राज्याला विशिष्ठ असा कोणताही धर्म नाही. कोणत्याही धर्मास भारत राजाश्रय देणार नाही किंवा कोणत्याही धर्माचा तिरस्कार करणार नाही. सर्व धर्मातील लोकांना समानतेची वागणूक देण्याचे मान्य करण्यात आले आहे. कसल्याही प्रकारचा धार्मिक भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी दिली जाईल. भारतीय घटनेने कोणत्याही एका धर्मास महत्व दिलेले नाही. धर्म ही व्यक्तिगत बाब



Scanned with OKEN Scanner

समजून धर्माकडे समानतेच्या भुमिकेतून पाहण्याचा दृष्टिकोन स्वीकारला आहे. घटनाकारांनी देखील भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण होईल या हेतूनेच घटनेत कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचे अधिकार स्पष्ट केलेले आहेत. या अधिकारानुसार प्रत्येक नागरीक व व्यक्ति यांना आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचा आणि धर्माचा प्रचार, प्रसार करण्याचा अधिकार दिलेला आहे. भारतात अनेक धर्म आहेत. त्यांच्यात ऐक्याची भावना टिकून राहावी यासाठीच मोठ्या प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. राजकारणात धार्मिकतेचा हस्तक्षेप होवू दिला जाणार नाही. परंतु सामाजिक सुधारणांसाठी व राष्ट्रहितासाठी राज्याला आवश्यकता वाटल्यास धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. व्यक्तीने आपल्या धार्मिक स्वातंत्र्याचे पालन करताना सार्वजनिक सुव्यवस्था, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक नैतिकता धोक्यात येणार नाही हे लक्षात घेवूनच धार्मिक स्वातंत्र्य उपभोगावयाचे आहे. भारतात कोणत्याही धर्माचा नागरीक देशाच्या सर्वोच्च पदावर येवू शकतो किंवा तसा अधिकार घटनेने त्याला दिलेला आहे. म्हणूनच भारताच्या सर्वोच्च पदावर विविध जाती धर्माच्या व्यक्ती बसलेल्या आढळतात. असे इतर काही देशांमध्ये आढळत नाही. उदा. पाकिस्थानमध्ये किंवा इतर मुस्लिम राष्ट्रांमध्ये 'गैर मुस्लिम' व्यक्ति सर्वोच्च पद धारण करू शकत नाही. इग्लंड सारख्या देशात देखील राजा हा प्रोटेस्टंट पंथियच असला पाहिजे म्हणून भारत खरोखरच धर्मनिरपेक्ष राज्य आढळते.

**iv. लोकशाही :-**

भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. हे दर्शविण्यासाठीच 'लोकशाही' शब्दाचा उल्लेख उद्देशपत्रिकेत केला आहे. भारतावर ब्रिटीश साम्राज्य असताना या लोकशाही शासन व्यवस्थेचा अनुभव भारतीय नेत्यांना होता. त्यामुळेच भारतीय घटनाकारांना लोकशाही शासन प्रकार जवळचा आणि सामाजिक, आर्थिक, राजकिय प्रगतीसाठी योग्य वाटला. ज्या राजकीय व्यवस्थेत नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग असतो तिला लोकशाही शासनव्यवस्था म्हणतात. भारताचा राज्य कारभार जनतेने प्रौढ मताधिकाराच्या आधारावर निवडून दिलेल्या प्रतिनिधि मार्फत चालविला जातो. त्यामुळे भारतीय राज्य लोकशाही, प्रजासत्ताक स्वरूपाचे आहे. 'लोंकांचे लोकांनी व लोकांकरीता चालविलेल शासन' ही लिंकनची लोकशाहीची कल्पना मान्य करून घटनाकारांनी लोकशाही अथवा प्रजासत्ताक हा शब्द उद्देशपत्रीकेत समाविष्ट केला आहे. प्रजासत्ताक या शब्दाने घटनेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य करून प्रतिनिधिक लोकशाही शासन पध्दतीचा पुरस्कार केला आहे. म्हणजेच लोकांनी प्रत्यक्ष निवडलेले प्रतिनिधी देशाचा राज्यकारभार चालवतात. भारतीय घटनाकारांनी लोकशाही शासन प्रकाराकडे केवळ राजकिय



Scanned with OKEN Scanner

दृष्टिकोनातून पाहिलेले नाही तर त्यांनी या राजकिय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याचे उदिष्ट जनतेसमोर ठेवले आहे. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या मते राजकिय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत झाले पाहिजे. घटनेने भारतातील सर्व प्रौढ स्त्री-पुरूषांना मतदानाचा अधिकार दिला आहे. त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे राज्य प्रस्थापित होणे म्हणजेच प्रजारत्ताक होय.

**v. गणराज्य :-**

गणराज्य म्हणजे ज्या देशाचा राष्ट्रप्रमुख जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निर्वाचित असतो त्याला गणराज्य असे म्हणतात. म्हणून घटनेच्या उद्देशपत्रिकेतच लोकशाही गणराज्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार भारताचा राष्ट्रप्रमुख हा (राष्ट्रपती) प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष निवडून दिलेला राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक पाच वर्षानंतर भारतात राष्ट्रपतींच्या निवडणूका घेण्यात येतात. त्यानुसार राष्ट्रपतींची निवड पाच वर्षासाठी करण्यात येते. म्हणून भारत हा देश गणराज्य आहे. भारत हा लोकशाही गणराज्य देश आहे. सर्वच देश लोकशाही गणराज्य किंवा प्रजासत्ताक गणराज्य असतात असे नाही. उदा. इंग्लंड हा देश प्रजासत्ताक आहे परंतु गणराज्य नाही. कारण त्यांचा राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरागत राजपदावर येतो. राजाचा मुलगा राजा होतो. रशिया, चीन गणराज्य असले तरी प्रजासत्ताक राज्य नाहीत. भारतात मात्र राष्ट्रप्रमुख वंशपरंपरेने सत्तेवर येत नाही तर तो जनतेने निवडलेल्या प्रतिनिधीद्वारेच विशिष्ट काळासाठी (पाच वर्षासाठी) सत्तेवर येतो. आणि जनतेने प्रत्यक्ष निवडलेल्या प्रतिनिधी मार्फतच देशाचा राज्यकारभार चालविला जातो. म्हणूनच भारत प्रजासत्ताक गणराज्य पध्दतीचे लोकशाही राज्य आहे.

## ३ राजकीय व्यवस्थेची उद्दिष्ट्ये

भारतीय नागरीकांना कोणकोणती राजकिय उद्दिष्टे प्राप्त करून दिली जातील याचे संविधानाच्या उद्देशपत्रिकेतच स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या चार उद्दिष्ठांची भारतीय नागरीकांना शास्वती देण्यात आलेली आहे.

**i. न्याय**

भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेच्या माध्यमातूनच न्यायाचा पुरस्कार केलेला आहे. समाजाचा सर्वांगीण विकास करणे किंवा तशी संधी, परिस्थिती राज्याने निर्माण करणे म्हणजे 'न्याय' होय.

राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा विकास झाल्याशिवाय समाजाचा विकास होत नाही. त्यामुळे व्यक्तिला विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे न्याय होय. त्यामुळे



Scanned with OKEN Scanner

भारतीय घटनाकारांनी भारतीय नागरीकांना सामाजिक, आर्थिक, राजकिय न्यायाची हमी घटनेद्वारे दिलेली आहे.

**a) सामाजिक न्याय**

सामाजिक न्याय म्हणजे व्यक्तीला समाजात मानाने, सन्मानाने, प्रतिष्ठेने जीवन जगता यावे. समाजातील विषमता नष्ट करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. यासाठी घटनाकारांनी संविधानातच काही तरतुदी केलेल्या आहेत. उदा. कलम १५ द्वारे सामाजिक समानता प्रस्थापित करून कलम १७ द्वारे अस्पृष्यता नष्ट करण्यात आली आहे. थोडक्यात धर्म , वंश, जात, लिंग यावर आधारीत असणारी विषमता नष्ट करून सामाजिक न्याय प्रस्थापित करावयाचा आहे. परंतु आम्हाला खऱ्या अर्थाने अजुनही असा सामाजिक न्याय प्रस्थापित करता आलेला नाही. भारत सामाजिक न्यायापासून अनेक मैल दूर आहे.

**b) आर्थिक न्याय**

आर्थिक स्वरूपाचा न्याय म्हणजे देशातील आर्थिक विषमता नष्ट करून देशात आर्थिक समता प्रस्थापित करणे होय. समाजातील दारिद्र्य, बेकारी, विषमता यांचे उच्चाटन करणे म्हणजे आर्थिक न्याय होय. नागरीकांना उपजिवेकेची साधने उपलब्ध करून देणे, संपत्तीचे योग्य वाटप करणे, संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही याची काळजी घेणे, नागरीकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे म्हणजे आर्थिक न्याय होय. असा आर्थिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी भारताने समाजवादाचा मार्ग स्वीकारला होता परंतू १९९० पासून भारताने पुन्हा खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण धोरणाचा पुरस्कार करून भांडवलशाहीला प्रोत्साहन दिले आहे.

**c) राजकीय न्याय**

राजकीय न्याय म्हणजे नागरीकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष राज्यकारभारात सहभागी करून घेणे होय. राजकीय न्यायामध्ये नागरीकांना प्रौढमताधिकार देणे, निवडणूका लढविण्याचा अधिकार देणे, कोणतेही राजकीय पद भुषविण्याचा अधिकार असणे यांचा समावेश होतो. या हक्कामुळे व्यक्ती राज्यकारभारात सहभागी होवून तीला राजकीय न्याय मिळतो. परंतु भारतातील पक्षीय राजकारण पाहिले असता राजकीय न्याय खरोखर प्रस्थापित होताना आढळत नाही. काही अपवाद वगळता विशिष्ट जाती, धर्मातीलच लोकांना तशी वारंवार संधी मिळताना आढळते. कारण अजूनही भारतीय राजकारणावर जाती, धर्माचा पगडा आढळतो. तो ग्रामपंचायतीच्या राजकारणापासून ते राष्ट्पतींच्या निवडणूकीपर्यंत हा प्रभाव जाणवतो. यांचे निराकारण करण्यासाठीच ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती करून राजकीय न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने व सत्ता विकेंद्रीकरणाच्या उद्देशाने महत्वपुर्ण पाऊल उचललेले दिसते.



Scanned with OKEN Scanner

### ii. स्वातंत्र्य

नागरीकांच्या सर्वांगीण विकासासाठी किंवा विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी काही स्वातंत्र्याची आवश्यकता असते. असे स्वातंत्र्य भारतीय नागरीकांना प्राप्त होण्यासाठी घटनेच्या उद्देशपत्रिकेतच त्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा, उपासना, धर्म यांचा समावेश करण्यात आला आहे. परंतु या स्वातंत्र्यांना संरक्षण दिले तरच त्यांना अर्थ प्राप्त होतो म्हणून घटनेच्या तिसऱ्या भागातील कलम १९ ते २२ या मुलभूत अधिकारांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. जर त्यावर संस्था, सरकार, व्यक्ती यांपैकी कोणीही आक्रमण केल्यास त्याविरूध्द न्यायालयात दाद मागता येते. घटनाकारांना स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे स्वैर स्वातंत्र्य असा घ्यावयाचा नसल्यामुळेच अशा स्वातंत्र्यावर काही मर्यादाही घालण्याचा अधिकार सरकारकडे दिला आहे. त्यामुळे मर्यादीत स्वातंत्र्यामुळे बंधनयुक्त स्वातंत्र्यामुळेच खरे स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली आहे.

### iii. समता

भारतीय नागरीकांना दर्जा आणि संधीची समानता देण्यात आली आहे. दर्जा आणि समान संधीसाठी घटनेत कलम १४ ते १८ मध्ये समानतेच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. धर्म, वंश, जात, लिंग असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्याची असणार आहे. तसेच कायद्यासमोर सर्व समान असणार आहेत. येथे समता म्हणजे सारखेपणा असा अर्थ घेता येत नाही. मानवाने जी काही कृत्रिम विषमता निर्माण केली आहे ती नष्ट करणे म्हणजे समता होय. याचा अर्थ घटनाकारांना निसर्गनिर्मित विविधता मान्य असून विविधतेची समाप्ती म्हणजे समता नव्हे उदा. हत्ती आणि ससा दोघेही गवत खातात. म्हणून दोघांनाही समान स्वरूपात गवत देणे म्हणजे समता नव्हे येथे सर्वांना समान संधी असली तरी काही अपवादही ठेवण्यात आले आहेत. उदा. एस.सी., एस.टी. जातींच्या उन्नतीसाठी काही जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

### iv. बंधूता

भारताचे ऐक्य व व्यक्तीची प्रतिष्ठा साध्य करणारी बंधुत्वाची कल्पना हे एक अंतिम उद्दिष्ट उद्देशपत्रिकेत स्वीकारण्यात आले आहे. भारतात प्रथमपासूनच अनेक जाती, जमातीचे, धर्माचे, वंशाचे लोक राहतात. त्यांच्यात अधुनमधून प्रांतवाद, जातीवाद, भाषावाद यासारख्या समस्या निर्माण होतात त्यामुळे अशा विविधतेत राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी बंधुत्वाची गरज आहे. त्यामुळेच घटनाकारांनी बंधूत्वाचे उद्दिष्ट्य स्वीकारले आहे. स्वातंत्र्य मिळत असतानाच भारताला धार्मिक कारणावरून फाळणीसारख्या समस्येला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे बंधुत्वाला फार महत्व प्राप्त झाले आहे. या बंधुत्वाबाबत स्पष्टीकरण देताना डॉ. बी. आर.



Scanned with OKEN Scanner

आंबेडकर म्हणाले होते की, 'दुसरी एक गोष्ट आपणाजवळ नाही ती म्हणजे बंधुत्व किंवा भातृभाव. बंधुता म्हणजे हिंदी राष्ट्रातील सर्व हिंदी लोक हे बांधव आहेत. आपण हिंदी लोक भाऊ भाऊ आहोत ही भावना.'

**सारांश**

भारतीय घटनेची उद्देशपत्रिका संविधानाचा भाग आहे किंवा नाही याबाबत अनेक मतभेद आहेत. परंतु जेव्हा केव्हा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतो तेव्हा विचारवंतासह सर्वोच्च न्यायालयही या उद्देशपत्रिकेचा आधार घेत असते. यावरून या उद्देशपत्रिकेचे महत्व स्पष्ट होत आहे. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका किती महत्वपुर्ण आणि अर्थपूर्ण आहे हे प्रा. आर्नेस्ट बार्कर याने आपल्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशल ॲन्ड पॉलिटिकल थेअरी' या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेनंतर उद्देशपत्रिका छापून स्पष्ट केले आहे. तो म्हणतो की, मी या ग्रंथात जे काही सांगितले आहे तेच मोजक्या शब्दात, सुत्ररूपाने या उद्देशपत्रिकेत सांगितले आहे. मला आनंद व अभिमान वाटतो की भारताने आपल्या स्वतंत्र राजकीय जीवनाची सुरूवात अशा तत्वाधिष्ठीत राजकीय प्रथांनी करावी की, ज्या प्रथा व जी तत्वे पाश्चिमात्य लोक आमची आहेत असे म्हणतील, परंतु त्यात त्याहून अधिक काहीतरी आहे.

**संदर्भ**


१. भारताचे संविधान, भारत सरकार विधि व न्याय मंत्रालय ,दिल्ली.
२. आपली संसद, सुभाष सी. कश्यप, अनुवाद न.ब. पाटील नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया नवी दिल्ली.
३. भारतीय शासन आणि राजकारण, बी.बी.पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापूर
४. दै.समता औरंगाबाद
५. https://en.wikipedia.org/wiki/preambie.
६. www.yourarticlelibrary.com/constitution
७. www.importantindia.com/१९१०/importaneeof-preamble-in-India-constitution


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

□□□

Scanned with OKEN Scanner